# राज्याचे निसर्ग पर्यटनाबाबतचे धोरण
# (Eco-Tourism Policy)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र. डब्ल्युएलपी १००२/प्र.क्र.५३/फ-१
दिनांक :- २० फेब्रुवारी, २००८

**प्रस्तावना :-**

पूर्वीपासून वन आणि विशेषतः राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य व व्याघ्र प्रकल्पाकडे पर्यटकांचा ओढा आहे. परंतु, निसर्ग पर्यटनाच्या विकासासाठी कोणतेही संघटित आणि पध्दतशीर प्रयत्न झालेले नाहीत.

या क्षेत्रात सर्व स्तरांवरून पर्यटनाकरिता सुखसोयी वाढविण्याची मागणी होत आहे. परंतु, निसर्ग पर्यटन म्हणजे पर्यटकांकरिता फक्त सोयी सुविधा वाढविणे असे नसून ही क्षेत्र जैविक विविधतेची आश्रयस्थाने असल्यामुळे अशा क्षेत्रांचे आहे त्या स्थितीत संरक्षण करणे अगत्याचे आहे. तसेच, ज्या लोकांची उपजिविका या क्षेत्रावर अवलंबून आहे व ज्यांना या क्षेत्राचे संवर्धन व संगोपन करणे आवश्यक वाटले पाहिजे त्यांचे आर्थिक परिस्थितीत वाढ करणे सुध्दा तेवढेच महत्वाचे आहे. पर्यटकांकरिता लागणा-या दैनंदिन सोयी सुविधा पुरवून या लोकांना लाभ मिळू शकतो. त्यामुळे राज्यात पर्यावरणचा कोणताही -हास न होता निसर्ग पर्यटनाच्या विकासासाठी तसेच निसर्ग पर्यटनाला चालना देण्यासाठी, स्थानिक लोकांची संस्कृती जतन करण्यासाठी, तसेच पर्यटक व स्थानिक या दोघांनाही लाभप्रद व्हावे, यासाठी एक निसर्ग पर्यटन धोरण ठरविणे आवश्यक असल्याने आता या शासन निर्णयाद्वारे राज्याचे निसर्ग पर्यटनाबाबतचे धोरण पुढील प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे :-

## २.० निसर्ग पर्यटनाची व्याख्या

"स्थानिक रहिवाशांच्या संस्कृतीचा आविष्कार, अप्रदुषित व नैसर्गिक क्षेत्रात वन्यपशुपक्षी व झाडेझुडपे यांचा अभ्यास, निसर्गाची ओळख तसेच निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी फिरणे म्हणजे निसर्ग पर्यटन ".

## ३.० निसर्ग पर्यटनाची तत्वे

१) "लहान ते सुंदर" लहानातून भव्य या उक्तीप्रमाणे निसर्ग पर्यटन छोटया प्रमाणात असावे.
२) पर्यावरणीय दृष्टिकोनातून, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टया तसेच आर्थिकदृष्टया योग्य असावे.

इको टुरीझम प्रकल्पाच्या बांधकामाकरीता प्रस्तावित निसर्ग पर्यटन विकास मंडळाने जागा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने भूसंपादन करण्यासाठी हया मंडळाला राजस्व विभागाचे अधिकार देण्याबाबत विचार करण्यात येईल.

४.४: महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ -

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ ही पर्यटनाची केन्द्रस्थ यंत्रणा असल्यामुळे काही प्रमुख व प्रसिध्द वन्यजीव क्षेत्राचा त्यांच्या जाहिरातीत सहभाग करीत आहेत. एकदा निसर्ग पर्यटनाचा कार्यक्रम तयार झाला व सर्व सोयी तयार झाल्यावर महामंडळ निसर्ग पर्यटन स्थळांना त्यांच्या कार्यक्रम पत्रिकेवर घेऊन निसर्ग पर्यटनास चालना देईल. तसेच यात्रा व्यवस्थापक, होटेल मालक तसेच स्थानिक लोकसमुहांचा आघाडीचा सहभाग घेऊन राज्याच्या पर्यटन नकाशावर निसर्ग पर्यटनांची स्थळे येण्याबाबत प्रयत्न करेल. सदरील महामंडळ वन क्षेत्राबाहेर काम करेल. तथापी वन क्षेत्रातील सहली आयोजित करण्यासाठी वन विभाग व महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ सोबत योग्य तो समन्वय ठेवेल.

४.५: खाजगी सहल व्यवस्थापक

खाजगी सहल व्यवस्थापकांनी स्थानिक जनता तसेच वन विभाग व महाराष्ट्र निसर्ग विकास मंडळाच्या सहकार्याने पर्यटकांना निसर्ग पर्यटनाकरिता येण्यास उद्युक्त करावे. तसेच स्थानिक लोकांच्या सहकार्याने पर्यटकांची राहण्याची, खाण्यापिण्याची व्यवस्था, पर्यावरणाचा कोणत्याही प्रकारचा -हास न होता संरक्षित क्षेत्राचे बाहेर खाजगी किंवा राजस्व विभागाचे जमिनीवर करावी. निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी स्थानिक लोकांनाच जास्तीत जास्त प्रमाणात मिळतील याची त्यांनी दखल घ्यावी . त्याच प्रमाणे त्यांना लागणारी सामुग्री ही जास्तीत जास्त स्थानीकरित्या मिळविण्याचा प्रयत्न करावा जेणे करुन पर्यटनाच्या अनुषंगिक स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

४.६: राज्य शासन

राज्य शासन, ज्या ठिकाणी विकास कामे घेता येत नाहीत अशा दुर्गम भागात निसर्ग पर्यटनाच्या कार्यक्रमात जास्तीत जास्त आर्थिक योगदान देण्याचे प्रयत्न करेल. राज्य शासनाने डिसेंबर २००६ मध्ये घोषीत केलेल्या पर्यटन धोरणा २००६ मधील परिच्छेद ४ मध्ये अनुक्रमांक (१३) वर निसर्ग पर्यटन प्रकल्पाचा समावेश केला आहे. त्यामुळे त्या धोरणा अंतर्गत प्रस्तावित वित्तीय व इतर सुविधा आपोआपच निसर्ग पर्यटन प्रकल्पांना लागू होतील. फक्त निसर्ग पर्यटन

## ५.३ निवास व्यवस्था

संरक्षित क्षेत्रात (अभयारण्यात/राष्ट्रीय उद्यानात ) नवीन बांधकाम केले जाणार नाही. फक्त जुन्या इमारतींचे नुतनीकरण/दुरुस्ती करण्यात येईल. जंगलातील वास्तव्य व निसर्ग पाहण्याकरिता वन विश्रामगृहे व निरीक्षण कुटी विविध ठिकाणी आहेत. अभयारण्य/राष्ट्रीय उद्यानाबाहेरील वन विश्रामगृहे व निरीक्षण कुटींची कायापालट करता येईल, जेणेकरुन निसर्ग पर्यटनास चालना मिळेल.

पर्यटक समुहांना विवक्षित ठिकाणी तंबू किवां राहुटी मध्ये राहता येईल.

स्थानिक गावकरी पाश्चात्य पध्दतीचे शौचालय व स्नानघर तयार करुन त्यांचे घरी पर्यटकांना योग्य मोबदला घेऊन अतिरिक्त निवासस्थान उपलब्ध करुन देऊ शकतील त्याच प्रमाणे पर्यटकांकरिता निसर्ग मार्गदर्शक म्हणून काम करु शकतील. हयामुळे पर्यटकांना परंपरागत पध्दतीच्या निवासस्थानात राहण्याचा आनंद मिळू शकेल तसेच यामुळे स्थानिक लोकांना त्वरीत आर्थिक लाभ मिळेल. या पध्दतीचे निवासस्थान तयार करण्याचे तसेच पर्यटकांचे आदरातिथ्य करण्याचे प्रशिक्षण स्थानिक लोकांना देण्यात येईल. हया करिता आदिवासी विकास विभागाच्या सहाय्याने आदरातिथ्य व्यवस्थानाचे प्रशिक्षण (Hospitality Management Training) स्थानिक युवकांना देण्याकरीता आर्थिक तरतूद करण्यात येईल.

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ वनक्षेत्रामध्ये व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ वनक्षेत्राबाहेर बुश कॅम्पच्या धरतीवर रहाण्याची ठिकाणे विकसित करतील.

निसर्ग पर्यटनाच्या सर्व कार्यक्रमात विद्यार्थी समूहाला विशेष सवलत देण्याची दखल घेण्यात येईल.

वरील सर्व ठिकाणी मुलभूत सोयी जसे, खानपान व्यवस्था तसेच शौचालय व स्नानघरे राहतील.

वन विभागाची विश्रामगृहे राज्यात बऱ्याच ठिकाणी आहेत. काही वनक्षेत्रात उदा. मेळघाटात अशा वन विश्रामगृहांची संख्या जास्त आहे. अशा ठिकाणी असलेल्या वन विश्रामगृहापैकी काही निवडक वन विश्रामगृह पर्यटकांना निवासाकरीता उपलब्ध करुन देण्यात येतील. तसेच ही वन विश्रामगृहे स्थानिक संयुक्त वन व्यवस्थापन समिती अथवा स्थानिक बचत गटाला व्यवस्थापनाकरीता हस्तांतरीत करण्यात येतील.

चर्चासत्र, कार्यशाळा, बैठका तसेच यशस्वी पर्यटन क्षेत्रास भेटी देऊन आवश्यक माहिती व प्राविण्य प्राप्त करावे.

५.६.२:<u>स्थानिक रहिवासी</u>

सुरुवातीला स्थानिक लोकं पर्यटकांना मार्गदर्शक, सामानवाहक, माळयांची कामे करणे व त्यांचे निवासस्थानी पर्यटकांची राहण्याची सोय इत्यादी सेवा उपलब्ध करुन देतील हयाकरीता स्थानिक रहिवांशाना योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. स्थानिक हस्तकलेची दुकाने आणि वनऔषधीची दुकाने उघडतील. तद्नंतर ते स्वतःहून निसर्ग पर्यटनाची व्यवस्था करण्यायोग्य होतील अशी अपेक्षा आहे. स्थानिक लोकांना कौशल्यप्राप्तीकरिता कमी अवधीचे प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच त्यांना यशस्वी निसर्ग पर्यटन केंद्रास भेटीचे आयोजन करण्यात येईल. त्यामुळे स्थानिक लोक निसर्ग पर्यटन या नवीन कार्यक्रमास यशस्वीपणे तोंड देतील. Hospitality Management चे प्रशिक्षण स्थानिक युवकांना देण्याकरिता आदिवासी विकास विभागाकडून आर्थिक तरतूद करण्यात येईल.

**<u>महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ</u> (Maharashtra Eco Tourism Promotion Board) बाबतची घटना, संरचना, नियम, अधिकार इत्यादींसाठी अलाहिदा आदेश काढण्यात येतील.**

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(नितीन काकोडकर)**
**सह सचिव (वने)**

प्रति,

मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.